# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 312 /2024-25 दि. 05/06/2024

## परिपत्रक

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी कर्मचारी यांची दैनंदिन हजेरी बायोमेट्रिक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीनमध्ये नोंदविण्यात आलेली आहे. व त्यानुसार सर्व कर्मचारी सदर मशीनमध्ये हजेरी नोंदवित असून बायोमेट्रिक मशीनमधील रिपोर्टनुसार वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि काही विभागातून परस्पर त्यांच्या विभागांतर्गत कार्यरत ठेका कर्मचारी यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही केली जात आहे व सदर कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक फेस डिटेक्शन अटेंडन्स मशीनमध्ये नोंद करण्यात आलेली नाही.

तरी सदर कर्मचारी यांचे हजेरीपत्रक ठेकेदार यांचेकडून घेण्याबरोबरच संबंधित विभागप्रमुख यांनी सुध्दा त्यांची मासिक हजेरी प्रमाणित करण्याची कार्यवाही करण्यात यावी व तद्नंतरच देयक अदा करण्याची कार्यवाहीस सुरुवात करावी.

05.6.2024

(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख / खातेप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका
प्रत :-
उप-आयुक्त (सर्व)